प्रा. डॉ. आत्मासाहेब हरदोरे - शिंदराम

ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year-VI, Issue - XI, Vol.-IV | Impact Factor 6.10 (GRIFI) | Sept, 2019 To Feb. 2020

IAP
INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF
Prof. Dnyanraja Chighalikar

121

IMPACT FACTOR
6.10

ISSN 2454-3292

International Registered & Recognized Research
Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XI, Vol. IV
Year- VI, Bi-Annual (Half Yearly)
(Sept. 2019 To Feb. 2020)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Prof. Dnyanraja Chighalikar
Head, Dept. of Economics, A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Prof. Swyamprabha Sarmagdum
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

Prof. Sanjivini Patil
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.)
India

DEPUTY EDITOR

DProf. Dharmvir Kshirsagar
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.)
India

Prof. Samir Kulkarni
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

CO - EDITOR

Vanita Jadhav
Mother Terasa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
(Karnataka)

Dr. B. S. Thombare
Head, Dept. of Geography,
Babaji Date Colletge,
Yavatmal, Dist. Yavatmal (M.S.)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Sivappa Rasapali
Dept. of Chemistry & Biochemistry,
UMASS. Wesport Road,
Dartmouth, MA (U.S.A.)

Dr.Eknath J. Helge
Head, Dept. of Commerce,
Jijamata Mahavidyalaya,
Buldhana, Dist. Buldhana (M.S.)

Dr.Sarjerao R. Shinde
Principal
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr.Satyenkumar P. Sitapara
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarba
(Karnataka)

Dr. Allabaksha Jamadar
Head, Dept. of Hindi,
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr. Sakharam V. Kakade
Dept. of Zoology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Issue : XI, Vol. IV
IWRJ
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2454-3292
Sept. 2019 To Feb. 2020

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विलीनीकरण : मलमपट्टी की संजीवनी<br>**डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे** | 1 |
| 2 | सर्वसमावेशक वृद्धी आणि भारत<br>**कैलास सत्यवान शेलार** | 10 |
| 3 | वर्धनगड - एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ<br>**डॉ. खंडेराव शिंदे** | 15 |
| 4 | मा. खा. कै. सदाशिवराव मंडलिक यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा<br>**पांडुरंग राणबा फराकटे** | 19 |
| 5 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यासमोरील आव्हाने : एक दृष्टीक्षेप<br>**बाबली गंगाराम गावडे** | 23 |
| 6 | तौलनिक साहित्याभ्यासातील अनुवादाचे महत्व व आवश्यकता<br>**डॉ. भरत जाधव** | 27 |
| 7 | जागतिकीकरण आणि मराठी स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. सुखदेव नारायण एकल** | 31 |
| 8 | बोलीनिर्मितीची प्रक्रिया<br>**आशालता नारायण खोत** | 35 |
| 9 | देवदासी चळवळीतील गौराबाई सलवादे यांचे योगदान<br>**कु. हर्षदा आण्णापा कुंबळाळे** | 39 |
| 10 | जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम<br>**श्रीरंग अरविंद तराळ** | 44 |
| 11 | स्त्री-पुरुष समानता<br>**संध्या ज. माने** | 50 |
| 12 | बदलती जीवनशैली आणि अपले आरोग्य<br>**सुरेश गणपतराव धुरे** | 54 |
| 13 | महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील चळवळीत - स्त्रियांचा सहभाग एक समाजशास्त्रीय विश्लेषण<br>**डी.एस. काळे** | 58 |
| 14 | समाज माध्यम : एक चिकित्सक अभ्यास<br>**बळवंतराव क. जाधव** | 62 |



127

| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 15 | कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या<br>**डी.जी. चिघळीकर, डॉ. एल.एच. पाटील** | 67 |
| 16 | महाविद्यालयीन शिक्षक-प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त रजांच्या अद्यावत तरतूदी<br>**राजेंद्र आप्पासाहेब तराळ** | 72 |
| 17 | विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या २० वर्षातील कार्याचा आढावा<br>**गौतम गणपती काटकर** | 81 |
| 18 | शासनाच्या निर्मल ग्राम योजनेच्या अनुषंगाने नेसरी ग्रामपंचायतीची दिशा<br>**जे.के. ससाने** | 87 |
| 19 | कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे योगदान (इ.स. १९६२ ते २००२)<br>**तुकाराम महादेव पाटील** | 94 |
| 20 | संविधानिक नैतिकतेलाच आव्हान<br>**डॉ. आण्णासाहेब हरदारे** | 99 |
| 21 | आजची तरुणाई आणि सोशल मिडीया - एक सामाजिक समस्या<br>**अजिंक्य दत्तात्रय पाटील** | 103 |
| 22 | ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यटन<br>**डॉ. संजय हणमंत भोसले** | 106 |

**Indo Western Research Journal (IWRJ)**

IMPACT FACTOR
6.10

ISSN 2454-3292

Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XI, Vol. : IV
Sept. 2019 To Feb. 2020
www.irasg.com

**Research Paper** 20

# संविधानिक नैतिकतेलाच आव्हान

**डॉ. आण्णासाहेब हरदारे**
शिवराज महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना**

भारतातील लोकशाहीचा प्रयोग गेली ७० वर्षे अखंडीतपणे विनाव्यत्यय सुरू राहिला, याचे कारण म्हणजे 'भारतीय संविधान' भारतीय संविधानाचे उद्दिष्ट दुहेरी स्वरूपाचे होते. राज्यकारभारासाठी आवश्यक असलेल्या राजकीय, प्रशासकीय आणि काही अंशी आर्थिक संस्थांच्या चौकटी जशा जगातल्या इतर संविधानात असतात तशा निर्माण करायच्या होत्याच; पण त्याचबरोबर नव्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कशतिक मन्वंतराची प्रक्रियाही या संविधानाद्वारे देशात सुरू करणे अपेक्षित होते. देश सामाजिक, आर्थिक विषमतांनी ओतप्रोत भरलेला असताना आणि भारतीय परंपरेत लोकशाहीच्या कोणत्याच तत्त्वाचा मागमूसही नसताना आधुनिक भारताची राजकीय लोकशाही संस्थांची निर्मिती संविधानकारांनी केली. दारिद्रय, निरक्षरता, मागासलेपण, बेरोजगार सगळयाच अरिष्टांचे प्रमाण मोठे होते. अस्पश्यतेसारख्या अमानुष प्रथा आणि स्त्री—दास्याचे भीषण प्रकार येथील जनजीवनात पक्के बसले होते. याची पूर्ण कल्पना असताना संविधानकारांनी राजकीय, सामाजिक व आर्थिक चौकटीच्या माध्यमातून लोकशाहीला आधारभूत ठरणाऱ्या आर्थिक व सामाजिक लोकशाहीची येथे प्रयत्नपूर्वक व जाणीवपूर्वक उभारणी केली. जबाबदार व प्रतिसाददायी प्रशासनातून संविधानिक नवसमाजरचनेची स्वप्ने साकार होतील, अशी आशा व्यक्त करून २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. आता तिला सत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. देशामध्ये गेल्या काही शतकात अगदी वेगाने घडणाऱ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. साहजिकच त्यात पेचदायक संविधानिक प्रश्नदेखील निर्माण झाले त्यामध्ये खरे आव्हान संविधानिक नैतिकतेचे.



PRINCIPAL
Shivaraj College of Arts,Commerce
& D.S.Kadam Science College,

128

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेमध्ये सांगितले होते की ''राज्यघटना कितीही चांगली का असेना, त्याची अंमलबजावणी करणारे लोक जर चांगले नसतील तर त्या राज्यघटनेचा काही एक फायदा होत नाही.'' राज्यघटनेमध्ये अनेक जागा अशा आहेत जेथे राज्यकर्त्यांना व घटनात्मक स्थान असणाऱ्या व्यक्तींना स्वत:ची सद्‌विवेक बुद्धी वापरावयाची आहे. जिथे संविधान मूक आहे अशा ठिकाणी संविधानिक नैतिकतेचा वापर करणे गरजेचे आहे. मुळात अ–लोकशाही असलेल्या भारताच्या भूमीत लोकशाहीचे हे कलम लावावयाचे आहे. इथे घटनात्मक नितीमत्ता ही सहजप्रेरणा नाही तर ती इथे मुद्‌दाम निर्माण करावी लागणार आहे. ती नैतिकता भारतात जोपासली जात नाही. संविधानिक नैतिकता जोपासली गेली नाही तर लोकशाही फक्त बहुमतापूरतीच उरेल.

लाष्कीसारख्या राजकीय विचारवंताच्या हक्कविषयक मांडणीचा प्रभाव भारतीय संविधानकारांच्या मनावर होता. माणसाला आपल्या आयुष्यात सर्वोत्तम टप्प्यापर्यंत पोहचता येईल अशी सामाजिक परिस्थिती अस्तित्वात आणणे हे त्याच्या हक्काचे प्रयोजन होते. त्याला अनुसरूनच संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत हक्कांचा अंतर्भाव केला गेला. सामाजिक दृष्टया भारतीय समाज हा क्रमशील विषमतेच्या तत्वावर उभारलेला होता. सामाजिक उच्च निचता ही पराकोटीची होती. आर्थिक क्षेत्रातही भेदभाव किंवा विषमता भयंकर होती. तेव्हा अशा पूर्वापार विषमतेवर आधारीत असलेल्या समाजाला नवे लोकशाही स्वरूप देणे आणि समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेचे निराकरण करून सर्व नागरिकांना समान संधी करून देणे ही दुहेरी जबाबदारी संविधान शिल्पकारांसमोर होती. त्या दृष्टीने समतेच्या हक्काचा मूलभूत हक्कामध्ये समावेश केला. समतेच्या हक्कानुसार अस्पश्श्यता नष्ट करण्यात आली असून कोणत्याही स्वरूपात अस्पश्श्यता पाळण्यास मनाई करण्यात आली आहे (अनु.१७) अस्पश्श्यतेमुळे जर कोण्या व्यक्तीवर आपत्रता लादली गेली तर कायद्याप्रमाणे गुन्हा ठरतो. त्यासाठी अस्पश्श्यता निवारण कायदा देखील करण्यात आला. कोटयावधी अस्पश्श्यांना त्यांच्या युगायुगाच्या दास्यत्वातून व सामाजिक गौणत्वातून मुक्त करणे हा हेतू पाठीशी असलेले हे कलम समतेच्या हक्काविषयी कलमामधील 'सुवर्ण कलम' म्हणावे लागेल. पण या तरतुदीचे अपेक्षीत व क्रांतीकारक परिणाम अजून प्रत्यक्षात अनुभवास येताना आढळत नाही. ग्रामीण जीवनात विशेषत्वाने अस्पृश्यता पाळली जाते. जनमानसात अद्यापही अस्पश्श्याबद्‌दलची प्रतिमा पूर्णपणे सन्मानाची व बरोबरीची दिसत नाही. समाजाचा या वर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आजही दयेचा, सहानुभूतीची कीव करण्याचा आहे असे म्हणता येईल. तो बदलणे ही पहिली निकड आहे. यामध्ये संविधानकर्त्यांनी संविधानिक जनतेच्या नैतिकतेचा आधार घेऊन मुलभूत हक्कांच्या गाभ्यामध्ये जनतेच्या नैतिकतेची अपेक्षा केली होती. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, जर दीर्घकाळपर्यंत ही विषमता साध्य झाली नाही तर भारतातली राजकीय लोकशाही संकटात आल्यावाचून राहणार नाही. विषमता लवकरात लवकर नष्ट केली पाहिजे, नाही तर विषमतेने गांजलेले लोक या घटना समितीने मोठया परिश्रमाने उभे केलेल्या राजकीय लोकशाहीचे मंदिर उद्‌ध्वस्त केल्यावाचून राहणार नाहीत.

यासाठी आपण भारतीयांनी मुलभूत हक्कांची ज्याप्रकारे अपेक्षा केली त्याप्रमाणेच संविधानाला अपेक्षित असलेली नैतिकता जोपासली पाहिजे.

घटनेमध्ये समतेइतकेच स्वातंत्र्याच्या हक्कांनाही महत्त्व आहे. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्यांकावर अल्पसंख्यांकाचे प्रभुत्व, स्वातंत्र्याशिवाय नुसतीच समता असेल तर ती वैयक्तिक कर्तव्यशक्ती नाहीशी करु शकते, आणि बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य व समता यांचा नैसर्गिक विकास होवू शकणार नाही. अशा या स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचे महत्त्व विषद करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ' स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तीन तत्वे वेगवेगळी नाहीत. त्या तिघांचा मिळून एक संच आहे. त्या तिघांची एक त्रिगुणात्मक मूर्ती आहे. ती एकमेकांपासून अलग करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतू नष्ट होऊन जाईल. भारताच्या सर्व नागरीकांना घटनेने ६ प्रकारची स्वातंत्र्ये दिलेली आहेत. भाषणाचे, मतप्रदर्शनाचे, शांततापूर्वक व नि:शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य. या हक्कांवर राज्याच्या सुरक्षिततेसाठी, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता, नैतिकता, सर्वसाधारण जनतेचे हित आणि आरोग्य या निमित्ताने मर्यादा घातल्या आहेत. यासाठी संसदेने वेळोवेळी कायदे केले; पण भारतीय जनतेने आपले स्वातंत्र्य हे आपल्या विचार, कृतीमध्ये परावर्तीत केल्याचे दिसत नाही. लोकशाहीत आपले मत मांडण्याचा आणि सरकारच्या कोणत्याही निर्णयाविरूद्ध आवाज उठविण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे,याबद्दल दूमत असण्याचे कारण नाही. मुद्या एवढाच की, विरोधाचा मार्ग कोणता असावा? आज देशात सरकारच्या निर्णयाविरोधात निदर्शने आणि आंदोलने होत आहेत. त्याचे हिंसक स्वरूप पाहता ती कधीच उचित ठरत नाहीत. हिंसाचारात सार्वजनिक संपत्तीचे अतोनात नुकसान होत आहे आणि निर्दोष लोकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार देशभरात झालेल्या निषेधात्मक निदर्शकांनी कोटयावधी रूपयांची नासधूस केली. बसेस जाळणे, रूळ आणि रेल्वे रोखून ठेवणे, घरे व दुकानांचे नुकसान करणे आणि गर्दीत सापडलेल्या निरपराध व्यक्तींचे जीव घेणे हे कदापि समर्थनीय ठरणार नाही. निदर्शकांना किंवा आंदोलकांना मत मांडण्याचा किंवा सरकारच्या निर्णयाविरूद्ध आवाज उठवण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे; पण हा जो अधिकार दिला आहे त्यामागच्या भारतीय संवैधानिक नैतिकतेचं काय? ज्याचा आपण मर्यादामध्ये उल्लेख केला. महात्मा गांधीनी अहिंसेचा संदेश देऊन इंग्रजांच्या जोखडातून देशाला मुक्त केले, त्यांचा आदर्श जगामध्ये पाळला जातो. पण गांधीजींच्या देशात हिंसक निदर्शने कितपत रास्त ठरतात ?

संसदीय लोकशाहीत राष्ट्रपती आणि राज्यपालांचे स्थान महत्वाचे असते. अगदीच वैधानिक दश्ष्टिकोनातून पाहावयाचे ठरविल्यास असे म्हणावे लागेल की, राष्ट्रपतीइतका अधिकारसंपन्न व निरंकुश सत्तेचा स्वामी जगातल्या कोणत्याच लोकशाही राष्ट्रात कधीच नव्हता आणि आजही नाही. नियुक्त केलेल्या सर्व अधिकाऱ्यांना, पंतप्रधानांसह सर्व मंत्र्यांना तो पदच्युत करू शकतो. संसद बरखास्त करू शकतो आणि वटहुकूम काढू शकतो. हे अधिकार वापरत असताना वैधानिक दश्ष्टिकोन वापरून आणि राजकीय व्यवस्थेच्या तात्कालिक

परिस्थिती संदर्भात 'सद्विवेक बुद्धीचा' वापर करून निर्णय घ्यावे लागतात. परंतु राष्ट्रपतींच्या अधिकारांचा विचार करता राष्ट्रपतींनी काही वेळा संविधानिक नैतिकतेचा किंवा विवेकाधिकाराचा वापर न करता भूमिका पार पाडल्याचे दिसून येते. त्यामध्ये आणिबाणीचे अधिकार असो की राज्यातील सरकार स्थापन करण्यात. राष्ट्रपतींनी धोरणाच्या किंवा निर्णयाच्या पातळीवर सत्ताधारी पक्षाशी जुळवून घेतल्याचे दिसते. देशात राष्ट्रपतींच्या निर्णयामुळे घटनात्मक पेच–प्रश्न निर्माण झालेतच त्याचबरोबर संवैधानिक नैतिकतेचे भान राष्ट्रपतींना राहिल्याचे दिसत नाही. राज्यपालांच्या भूमिकेबद्धल सुद्धा अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. उदा. महाराष्ट्राच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यपालांनी जी भूमिका बजावली, त्यावरून असे स्पष्ट होते की, या घटनात्मक प्रमुखांनी राजकीय प्रभावाखाली आणि आवेशाने बजावले आहेत. त्यामध्ये संविधानिक नैतिकता किंवा विवेकवाद दिसून येत नाही. महाराष्ट्राच्या बाबतीत राज्यपालांनी निर्णय घेत असताना कायदा व संविधानिक नैतिकतेला धरून निर्णय घेणे अपेक्षीत होते. राष्ट्रपती आणि राज्यपालांनी राजकीय किंवा सत्ताधारी पक्षाचे राजकीय हस्तक असल्यासारखे निर्णय घेणे चूक आहे. संघराज्यात्मक रचनेच्या सुविहित अंमलबजावणीच्या दृष्टिने राष्ट्रपती व राज्यपालांनी प्राप्त परिस्थिती समोर ठेवून सकारात्मक भूमिका घेऊन स्वविवेकाधिकार वापरणे गरजेचे आहे. कारण भारतासारख्या खंडप्राय देशात लोकशाही म्हणजे बहूमत अशा आशयाच्या राज्यकर्त्यांच्या भूमिकेमुळे लोकशाही हे मूल्य आहे, हे रूजलेले नाही. त्यामुळे आपण फक्त राजकीय लोकशाही स्थापन करू शकलो. त्यामुळे देशातील सर्व घटकांनी संविधानिक नैतिकता जोपासली नाही तर भारतातील लोकशाही फक्त मतदानापुरती उरेल !

## संदर्भ सुची :-


1. Prof. S.P. Verma – Development Politics & Social Theory- Sterling Publications, New Delhi.
2. Prof. Raj Kumar – Essays on Indian Politics - Discovery Publications, New Delhi

३ डॉ. भा. ल. भोळे – भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, औरंगाबाद

४ प्रो. एस.सी. मेहता – भारतीय संविधान – राजस्थान हिंदी अकादमी, राजस्थान

५ डॉ. प्रकाश पवार – राजकीय अर्थकारण – डायमंड प्रकाशन

६ परिवर्तनाचा वाटसरु ( मासिक )

७ समाज प्रबोधन पत्रिका ( त्रैमासिक )